# कृषि उत्पन्न बाजार समिती रिसोड ता.रिसोड जि.वाशिम

**स्थापना :- १९५३**

## सन २०२४- २५

## वार्षिक आमसभा

## दिनांक २१/०९/२०२५ रोज रविवार
## वेळ सकाळी १२.००

# कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड ता.रिसोड जि.वाशिम

जा.क्र/कृउबास/१०४/२५/वार्षिक सर्वसाधारण सभा सन २०२४-२५ दिनांक :-०३/०९/२०२५

**प्रती,**

श्री.........................................................................मु...........................पो..................

ता.रिसोड जि.वाशिम अध्यक्ष तथा सदस्य सेवा सहकारी संस्था/सरपंच तथा उपसरपंच ग्राम पंचायत/अनुज्ञाप्ती अडते/व्यापारी प्रतिनिधी/सदस्य हमाल मापारी संघटना.

आपणास कळविण्यात येते कि, कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोडचे कायद्यातील सुधारित तरतुदीनुसार महा.कृषी उत्पन्न (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम २७ (अ) नुसार रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१/०९/२०२५रोज रविवार ला दुपारी १२:०० वाजता रिसोड बाजार समितीचे कार्यालयामध्ये आयोजित केली आहे. तरी आपण या सभेस उपस्थित राहावे हि विनंती.

**सभेपुढील विषय:-**

०१) बाजार समितीच्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
०२) सन २०२४-२५ चे आर्थिक वर्षातील हिशोबपत्रकाचे वाचन करणे.
०३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अंकेक्षण अहवालाचे वाचन करणे.
०४) बाजार समितीच्या सन २०२४-२५ च्या वार्षिक प्रशासकीय अहवालाचे वाचन करणे.
०५) मा.अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर विचार विनिमय करणे.

**श्री.विष्णुपंत कडुजी भूतेकर**
**सभापती**
**कृ.उ.बा.स.रिसोड**
**(संचालक मंडळाचे आदेशान्वये)**

**सौ. इंदुबाई तेजराव वानखेडे**
**उपसभापती**
**कृ.उ.बा.स.रिसोड**

**श्री.विजय भीमराव देशमुख**
**सचिव**
**कृ.उ.बा.स.रिसोड**

**प्रतिलिपी,**

०१) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वाशिम.
०२) मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,रिसोड

**टिप :-** ०१) गणसंख्या पूर्तीचे अभावी सभा स्थगित झाल्यास त्याच ठिकाणी एका तासानंतर सभा घेतली जाईल. अशा सभेस गनपुर्तीची आवश्यकता भासणार नाही.
०२) संस्थेचे आर्थिक पत्रके संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावलेली आहेत.
०३) ज्यांना आर्थिक पत्रकाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांना संस्थेकडे दिनांक २०/०९/२०२५ ला दुपारी ०३:०० वाजेपर्यंत लेखी स्वरूपात पाठवावीत ह्या शिवाय वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे शक्य होणार नाही.

# कृषी उत्पन्न बाजार समिती,रिसोड जि.वाशिम

**प्रस्ताविक :-**

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १९५३ साली मध्यप्रदेश शासन कृषी विभाग दिनांक ११/०३/१९५३ अधिसूचना क्र १४४३-३३१९-१०-५२ मध्ये जाहीर केल्याप्रमाणे रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीची रिसोड जि.अकोला असे परिशिष्ट क्र १ मध्ये मनुद केल्या प्रमाणे तसेच कापूस बाजार दिनांक ०१/०४/१९५८ रोजीच्या मुंबई शासन राजपत्र भाग मध्ये मे औधोगिक आणि सहकार विभाग मुंबई यांचे प्रसिद्ध केलेल्या दिनांक ०१/०४/१९५८ रोजीच्या अधिसूचन क्र.एम.(एस) २५७२६१५६ एम डब्ल्यू एच मध्ये जाहीर केल्याप्रमाणे आहे.

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीची रचना बाजार समितीच्या कायद्यातील कलम १३ नुसार करण्यात आली असून दिनांक २५/०५/२०२३ ला नवीन संचालक मंडळ पदावर आले असून वार्षिक अहवाल वर्षात कृषी पत संस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था यांचा व्यवस्थापन समितीच्या सदस्याने निवडून दिले एकूण ११ सदस्यामध्ये दोन महिलांचा समावेश आहे.

ग्राम पंचायतच्या सदस्यांनी निवडून दिलेले ४ सदस्यांपैकी १ अनुसूचित जाती जमातीचा १ आर्थिक दुर्बल घटकातील व २ इतर ग्राम पंचायत मतदार संघातून असे एकूण ११ शेतकरी प्रतिनिधी आहेत.

अडते व्यापारी यांनी निवडून दिलेले २ सदस्य
हमाल मापारी यांनी निवडून दिलेले १ सदस्य
व तालुक्याचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था १ प्रतिनिधी
तालुक्याचे कृषी अधिकारी पंचायत समिती १ प्रतिनिधी

**कार्यक्षेत्र :-**

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्रात रिसोड तालुक्यापुरते मर्यादित असून कार्यक्षेत्रामध्ये एकूण ९९ गावाचा समावेश आहे. रिसोड कृषी उत्पन्न बाजार समिती कडे स्वतःचे मालकीची मुख्य बाजार आवाराकरीता ६ हेक्टर २८ आर व लोणी उपबाजार आवाराकरिता ०.८१ आर समितीची जमीन आहे. अशी एकूण समितीकडे स्वतःचे मालकीची ७.०९ हेक्टर जमीन उपलब्ध आहे.

**नियमन :-**

रिसोड बाजार समितीने उडीद,मुंग,गहू,सोयाबीन,चना,तुवर,हा.ज्वार,हळद, ,इत्यादी शेतमालाचे नियमन करण्यात आले तसेच गुरांच्या बाजाराचे सुद्धा समितीने नियमन केले असून साप्ताहिक गुरुवार ला बाजार समितीचे आवारात दिनांक ०७/०४/१९९४ पासून गुरांचा बाजार सुरु करण्यात आला आहे. दिनांक १४/०२/२००७ पासून गुरांचा आठवडी बाजार संत अमरदास बाबा संस्थानचे जागेवर भरविला आहे व तो कायम आहे.

**शेतमालाची आवक :-  (०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५)**

रिसोड मार्केट यार्डावर प्रामुख्याने खालील शेतमालाची आवक होत आहे. ०१) उडीद, ०२) मुंग, ०३) सोयाबीन, ४) हा.ज्वार, ०५) चना, ०६) तूर, ०७) हळद, इत्यादी शेतमालाची आवक झालेली आहे.

अहवाल वर्षात एकूण आवक क्विंटल ६,४१,६९९ झाली असून विवरण खालील प्रमाणे

| **अ.क्र.** | **शेतमालाचे नाव** | **आवक क्विंटल** | | **सरासरी भाव** |
|---|---|---|---|---|
| ०१) | उडीद | क्विंटल | ६६८ | रु. ८५२२ |
| ०२) | मुंग | क्विंटल | ४४७३ | रु. ७३०० |
| ०३) | सोयाबीन | क्विंटल | ३४५३३० | रु. ४११७ |
| ०४) | हा.ज्वार | क्विंटल | -- | रु. -- |
| ०५) | चना | क्विंटल | ४७७२९ | रु. ६१९५ |
| ०६) | तूर | क्विंटल | ९२८५६ | रु. ८६२८ |
| ०७) | हळद | क्विंटल | १५०६४३ | रु. १३५१८ |

एकूण आवक  ६,४१,६९९  क्विंटल

प्रामुख्याने सदर वर्षात सोयाबीन या शेतमालाची मोठ्याप्रमाणावर आवक झालेली असून इतर शेतमालाचे उत्पादनाचे प्रमाण चांगले असल्यामुळे आवक चे प्रमाण वाढले आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समिती,रिसोड जि.वाशिम

बाजार समितीचीस्थापना सन १९५३ मध्ये झाली यावेळी समितीकडे रिसोड शहरातील शासनाची ई क्लास २० आर जमिनीवर मध्यप्रदेश शासन निर्णय अधिसुचना क्र १४४३-३३१९-१०-५२ मध्ये जाहीर झाल्या प्रमाणे या जागेवर शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु करण्यात आले या नंतर समितीचे कापूस धान्य आवक वाढीमुळे या जागेवर शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार घेण्यास हि जागा गैरसोयीची वाटल्या मुळे समितीने सन १९७१ मध्ये खाजगी जमीन शेत सर्वे नं १०८/२२०(६) जमीन श्रीमती इंदिराबाई त्र्यंबक पांडे यांचेकडून ५ हेक्टर १९ आर व इतर जमीन शासनाकडून १ हेक्टर १८ आर अशी एकूण सद्यपरिस्थितीत ६ हेक्टर २८ आर जमिनीवर शेतमाल खरेदी विक्रीची व्यवहार सुरु आहेत हि नवीन जमीन बाजार समितीचे खरेदी विक्रीचे व्यवहार सन १९७१ पासून स्थलांतरित करण्यात आले असून या जमिनीवर बाजार समितीने धान्य बाजार कापूस बाजार करीता सुविधा निर्माण केल्या आहेत.

बाजार समितीची मागील ३ वर्षाचे उत्पन्न व खर्च दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | वर्ष | उत्पन्न बाजू | खर्च बाजू | वाढवा | तुट |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | २०२२-२३ | ४,२४,३६,९४० | ३,३३,१८,७१३ = ५२ | ९१,१८,२२६=४८ | - |
| ०२) | २०२३-२४ | ३,७५,३८,७६७ | २,२१,९६,१२६ | १,५३,४२,६४१ | - |
| ०३) | २०२४-२५ | ४,२०,४७,१९७ | २,८२,०४,७०७=१० | १,३८,४२,४८९=९० | - |

सभापती / सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड

## मुख्ययार्ड रिसोड

बाजार समितीने शेतकऱ्यांचा शेतमाल विक्री करीता खालील सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ०१) विद्युत व्यवस्था, ०२) टीनशेड सह धान्य ओटा, ०३) कार्यालयीन दुमजली इमारत, ०४) शेतकरी निवास ०५) डांबरीकरण रोड, ०६) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ०७) गोडावून, ०८) गुरांकरिता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ०९) शॉपिंग कॉम्प्लेक्स १०) बाजार समितीचे मुख्य यार्ड मध्ये एम.ए.सी.पि. (महा.स्पर्धाक्षम) योजनेअंतर्गत शेतमाला करीता हळदीचा ऑक्शन ओटा व उत्तर दक्षिण सिमेंट कॉंक्रिट रोड,गोडावून,शॉपकम दुकाने इत्यादी ११) समितीने हमाल मापाऱ्यांचे सुविधे करीता हमाल भवन बांधलेले आहे, १२) ५० टनी प्लेट वे ब्रिज काटा, १३) बाजार समितीने धान्य ओट्यावर शेतकऱ्यांचे शेतमालाचे मोजमाप जलद गतीने होण्याचे दृष्टीने समिती धान्य ओट्यावर जुने २५ व ४० नवीन ६५ नग इलेक्ट्रॉनिक काटे खरेदी केले आहेत. समितीचे उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने समितीने ०१/०४/२०११ पासून २५% भाड्यामध्ये वाढ केलेली आहे.

बाजार समितीचे आवारात पूर्णपणे चोहोबाजूने बंद करून मुख्य गेट मधून शेतमालाची आवक जावक होते जावक मालाची नोंद घेण्यास समितीचे कर्मचारी कार्यरत असून जाणाऱ्या मालावरील मार्केट फी वसुलीवर नियंत्रण ठेवण्यात नियंत्रण ठेवण्यात येते.

**पूर्ण झालेले कामे :-**

१) लिलाव ओट्याचे बाजूस ३०० x २० चा सिमेंट रोड
२) शेतकऱ्यांचा हळद हा शेतमाल खरेदी करण्या करीता २४० x ४० चा लिलाव ओटा समितीचे पूर्ण बाजूस
३) समितीचे यार्डात गेट टू गेट पूर्ण सिमेंटीकरण

**बाजार समितीचे आर्थिक विवेचन :-**

रिसोड बाजार समितीस मुख्यत्वे शेतमाल खरेदी विक्रीवरील किंमतीवरील बाजार फी चे उत्पन्न मिळते तसेच बाजार समितीने बांधलेल्या ईमारती,गोडावून,दुकाने, यापासून भाड्याचे उत्पन्न प्राप्त होते बाजार समितीचा अहवाल वर्षात सन २०२४-२५ या वर्षात खालीलप्रमाणे उत्पन्न झाले असून सोबतच खर्चाचे विवरण दिले आहे.

| **उत्पन्न बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| ०१) मार्केट फी | ३,७८,०४,५९० | ०१) सभा व सदस्य खर्च | २,८४,२४५ |
| ०२) अनुज्ञाप्ती फी | १,०४,३७० | ०२) अस्थापना खर्च | १,८९,६६,३५५ |
| ०३) इतर उत्पन्न | ४१,३८,२३७ | ०३) इतर खर्च | ८९,५४,१०८ |
| | | ०४) वाढावा | १,३८,४२,४८९=९० |

# कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड जि.वाशिम

## संचालक मंडळाची यादी

| अ क्र | संचालकांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. विष्णुपंत कडुजी भूतेकर | सभापती |
| २ | सौ. इंदुबई तेजराव वानखेडे | उपसभापती |
| ३ | श्री. गजानन रामकीसन पाचरणे | संचालक |
| ४ | श्री. गजानन प्रकाश अवताडे | संचालक |
| ५ | श्री. शामराव निंबाजी उगले | संचालक |
| ६ | श्री. श्याम दत्तराव खराटे | संचालक |
| ७ | श्री. राजेंद्र त्र्यंबकराव देशमुख | संचालक |
| ८ | श्री. धनंजय नारायण बोरकर | संचालक |
| ९ | श्री. राजाराम सोपान आरू | संचालक |
| १० | सौ. चंद्रभागा भावराव गरड | संचालिका |
| ११ | श्री. संजय सखारामजी शिंदे | संचालक |
| १२ | श्री. संतोष बाबाराव सानप | संचालक |
| १३ | श्री. भगवान परसराम गाडे | संचालक |
| १४ | श्री. रविंद्र परसराम चोपडे | संचालक |
| १५ | श्री. भीमा वामन शेजुळ | संचालक |
| १६ | श्री. रमेश प्रल्हाद गायकवाड | संचालक |
| १७ | श्री. पुरुषोत्तम पुंजूलाल तोष्णीवाल | संचालक |
| १८ | श्री. रामचंद्र सुखदेव बुधनेर | संचालक |
| १९ | मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रिसोड | शासन प्रतिनिधी |

# कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड जि.वाशिम

## बाजार समितीचे दि. ३१/०३/२०२५ रोजी कार्यरत कर्मचारी यादी

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| ०१ | श्री व्ही.बि.देशमुख | सचिव |
| ०२ | श्री व्ही.एस.गिऱ्हे | लेखापाल |
| ०३ | श्री आर.एस.दुबे | रोखपाल |
| ०४ | श्री पी.व्ही.सपकाळ | वरिष्ठ लिपिक |
| ०५ | श्री व्ही.ओ.देशमुख | निरीक्षक |
| ०६ | श्री ए.एफ.शिंदे | प्रतवारीकार |
| ०७ | श्री जि.के.धोंगडे | सांख्याकिक |
| ०८ | श्री जे.टी.पाचरणे | क.लिपिक |
| ०९ | श्री पी.जि.नरवाडे | क.लिपिक |
| १० | श्री पी.जि.राजे | क.लिपिक |
| ११ | श्री के.डी.पडघान | क.लिपिक |
| १२ | श्री जि.एम.पावडे | क.लिपिक |
| १३ | श्री एस.बि.घायाळ | क.लिपिक |
| १४ | श्री के.व्ही.मगर | शिपाई |
| १५ | श्री ए.बि.सदार | शिपाई |
| १६ | श्री आर.बी.वनवे | शिपाई |

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री एस.एन.खैरे | रोजंदारी चौकीदार |
| ०२ | श्री पि.के.गवळी | शिपाई |
| ०३ | श्री एस.एस.गि-हे | रोजंदारी क.लिपिक |
| ०४ | श्री एस.एस.पवार | रोजंदारी शिपाई |

# कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड ता.रिसोड जि.वाशिम

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (सन २०२४-२५)**

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रातील सर्व ग्राम पंचायत सरपंच, अध्यक्ष सेवा सहकारी संस्था किंवा त्यांचे एक प्रतिनिधी तसेच बाजार समितीचे संचालक मंडळ, आमंत्रित व्यापारी/अडते हमाल/मापारी प्रतिनिधी , शासकीय प्रतिनिधी यांना विनंती पूर्वक कळविण्यात येते कि, कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड जि वाशीम सन २०२४-२५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१/०९/२०२५ रोज रविवार दुपारी १२.०० वाजता बाजार समिती कार्यालय रिसोड येथे समितीचे मा सभापती श्री विष्णुपंत कडूजी भुतेकर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे.

तरी कृपया सभेला आपण सर्व उपस्थित राहावे हि विनंती.

**सभेपुढील विषय:-**

०१) बाजार समितीच्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
०२) सन २०२४-२५ चे आर्थिक वर्षातील हिशोबपत्रकाचे वाचन करणे.
०३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अंकेक्षण अहवालाचे वाचन करणे.
०४) बाजार समितीच्या सन २०२४-२५ च्या वार्षिक प्रशासकीय अहवालाचे वाचन करणे.
०५) मा.अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर विचार विनिमय करणे.

| | | |
|---|---|---|
| **श्री.विष्णुपंत कडुजी भूतेकर** | **सौ. इंदुबाई तेजराव वानखेडे** | **श्री.विजय भीमराव देशमुख** |
| **सभापती** | **उपसभापती** | **सचिव** |
| **कृ.उ.बा.स.रिसोड** | **कृ.उ.बा.स.रिसोड** | **कृ.उ.बा.स.रिसोड** |
| **(संचालक मंडळाचे आदेशान्वये)** | | |

**प्रतिलिपी,**

०१) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वाशिम.
०२) मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,रिसोड

**टिप :-** ०१) गणसंख्या पूर्तीचे अभावी सभा स्थगित झाल्यास त्याच ठिकाणी एका तासानंतर सभा घेतली जाईल. अशा सभेस गनपुर्तीची आवश्यकता भासणार नाही.
०२) संस्थेचे आर्थिक पत्रके संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावलेली आहेत.
०३) ज्यांना आर्थिक पत्रकाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांना संस्थेकडे दिनांक २०/०९/२०२५ ला दुपारी ०३:०० वाजेपर्यंत लेखी स्वरूपात पाठवावीत ह्या शिवाय वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे शक्य होणार नाही.